# SBI PEN. ASSN.'S SAMVAD

**स्टेट बँक पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल), पुणे यांची गृहपत्रिका**

Price ₹ 3/-

|| स्वयमेव मृगेंद्रता ||

# संवाद

***मनामनांचा मेळ जुळावा । द्वेषाचा लवलेश नसावा ।।***
***सादासी प्रतिसाद मिळावा । वाद नको संवाद असावा ।।***

**Vol.-4** **Issue - 7** **जानेवारी - २०१२** **January 2012**

## *संपादकीय*

**प्रिय सभासद मित्रांनो,**

नवीन वर्षाची सुरुवात झाली आहे. एकविसाव्या शतकाचे पहिले तप चालू आहे. दशक, शतक या प्रमाणेच तप हा शब्द १२ वर्षांचा काल म्हणून गणला जातो. त्या काळात विशिष्ट साधना अपेक्षित असते ती करणाऱ्यास तपस्वी म्हटले जाते. त्यातूनच नाट्य तपस्वी, कलातपस्वी इ. शब्द प्रचलित झाले. आता या जानेवारीच्या अखेरीस सांगली येथे नाट्यसंमेलन होणार आहे, तर फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यातच महाराष्ट्राच्या टोकाला असलेल्या चंद्रपूर येथे साहित्य संमेलन संपन्न होत आहे.

सांगली ही नाट्य पंढरी म्हणून प्रसिद्ध आहे तर चंद्रपूर गोंड राजधानी असलेली ५०० वर्षांची ऐतिहासिक नगरी आहे. या दोन्ही नगरीत नोकरी निमित्ताने राहण्याचा योग लाभला होता. चालिरिती, हवामान भिन्न असले तरी मराठी भाषा हा अतुट धागा आहे. त्यामुळेच महाराष्ट्र एकात्म होणार आणि अशा संमेलनामुळे ही प्रक्रिया अखंड चालू राहणार आहे. फार वर्षापूर्वी प्रा. श्री. म. माटे यांनी 'स्वर्गातील मराठी साहित्य संमेलन' हा अप्रतिम लेख लिहिला होता तो आठवला.

सांगलीच्या नाट्य संमेलनाचे अध्यक्ष नटवर्य श्री. श्रीकांत मोघे यांच्या 'वाऱ्यावरची वरात' मधील भूमिका आठवत असतानाच त्यांचा मराठी भाषा-शुद्धीवरचा कटाक्षही तितकाच महत्त्वाचा वाटतो. श्री. वसंत आबाजी डहाके प्रथितयश कवी, लेखक, समीक्षक संपादक आहेत. त्यांच्या अध्यक्षीय भाषणात मराठी टिकविण्याच्या दृष्टीने त्यांचे विचार मोलाचे ठरतील. श्री. मोघे आणि डहाके यांना 'संवाद'च्या साभिनंदन शुभेच्छा.

'लोकपाल' विधेयकाचे भवितव्य अद्याप अनिश्चितच आहे. परस्परांवर दोषारोप चालू आहेत. भ्रष्टाचार निपटण्याचा निर्धार सारेच करतात. बोलण्याला धार असते. पण कृतीला मात्र आधार नसतो हीच खरी व्यथा आहे.

ज्ञानपीठ विजेते कविश्रेष्ठ कुसुमाग्रज म्हणजे नाटककार वि. वा. शिरवाडकर यांच्या जन्मशताब्दीची सांगता फेब्रुवारीत होत आहे. त्यांच्या 'गरजा जयजयकार क्रांतीचा' सारख्या कविता, 'ययाति देवयानी', 'वीज म्हणाली धरतीला', 'नटसम्राट' सारखी नाटके ही मराठीची लेणी आहेत. एक सहृदय कवी, सुसंस्कृत व्यक्तिमत्व म्हणूनही ते अनेकांच्या स्मरणात आहेत. मराठीचे मानबिंदू म्हणून ज्यांच्याकडे अंगुली निर्देश करावा अशापैकी एक म्हणजे तात्यासाहेब. त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन.

जनगणमन हे आपले राष्ट्रगीत आहे. कविश्रेष्ठ रवींद्रनाथ टागोर यांची ही रचना. त्या रचनेला डिसेंबर २०११ मध्ये १०० वर्षे पूर्ण झाली. भारताची राजधानी कोलकाताहून दिल्लीला हलविण्यात आली त्या घटनेला शंभर वर्षे पूर्ण झाली. व्यक्ति जीवनाबरोबर राष्ट्राच्या इतिहासातील काही ठळक घटनांना महत्त्व असते म्हणून हा उल्लेख. भारताचे सरसेनापती म्हणून जनरल करिअप्पा यांनी १५ जानेवारी १९४९ ला अधिकार ग्रहण केले. तेव्हापासून १५ जानेवारी हा दिवस लष्कर दिन 'आर्मी डे' म्हणून साजरा होतो. भारत हे लोकसत्ताक राष्ट्र आहे. पण 'शस्त्रेण रक्षिते राष्ट्रे शास्त्रचिंता प्रवर्तते' हेही विसरून चालणार नाही.

१४ जानेवारीला मकर संक्रांत येते. संक्रमणाला सर्वच क्षेत्रात महत्त्व असते. उत्क्रांतीकडे, उन्नतीकडे वाटचाल यादृष्टीने स्नेह आणि सौजन्याचे प्रतीक असणारा 'तिळगूळ घ्या गोड बोला' या शब्दांनी अधिक जवळीक साधण्याची संधी लाभते. तुटलेला वाद जोडायला 'संवाद'च उपयुक्त ठरतो. आमच्या सभासदांना मकरसंक्रांती निमित्त शुभेच्छा.

समानी व आकूतिः समाना हृदयानिवः
समानमस्तु वो मनो यथा वः सुसहासति ।।

– **श्रीधर विश्वनाथ सहस्रबुद्धे**, भ्रमणध्वनी- ९८२३२८५३९०

# Requirement of PAN Card

We have received queries from Family pensioners / senior pensioners that Bank has asked them to furnish PAN Number to comply "KYC" norms as laid down by RBI. Many of them are not having PAN Card and are unable to furnish PAN Card / PAN Number. For information of all, we have to advise that PAN Card is the requirement of Income-tax Dept. If any body is not having PAN, then he/she should give a Declaration on Form 60 as per Section 114-B of the Income-tax Act.

We have, therefore, reproduced below the Form 60 as laid down in the Income-tax Act for information and compliance by the concerned pensioners / family pensioners.

*************************

## Form 60 of Income Tax Rules 1962

**Form of Declaration to be filed by a person who does not have either a Permanent Account Number or General Index Register Number and who makes payment in cash in respect of transactions specified in clauses (a) to (h) of rule 114B**

1. Full name and address of the declarant: ............................................................................................
   ……………………………………………………………………………………………………………………
   …………………………………………………………………………………………...........................................
2. Particulars of transaction:
3. Amount of the transaction:
4. Are you assessed to tax ? Yes/No
5. If yes,
   (i) Details of Ward/Circle/Range where the last return of Income was filed?
   (ii) Reasons for not having Permanent Account Number/ General Index Register Number
6. Details of the document being produced in support of address in Column(1)
   ………………………………………………………………………………….....................…..............

**Verification**

I, ……………………………….. do hereby declare that what is stated above is true to the best of my knowledge and belief.

Verified today, the ………………. day of ……………..20…..

Date: …………….
Place: ……………. ………………………  ........................................

Signature of the declarant

Instructions: Documents which can be produced in support of the address are:-

(a) Ration Card
(b) Passport
(c) Driving license
(d) Identity Card issued by any institution
(e) Copy of the electricity bill or telephone bill showing residential address
(f) Any document or communication issued by any authority or Central Government , State Government or local bodies showing residential address
(g) Any other documentary evidence in support of his address given on the declaration.

## Revision in Family Pension

Bank has revised Family Pension w.e.f. 1-05-2005 vide its e-Circular No.CDO/P&HRD-PM/62/2007-08 dt.28-01-2008. The Central Board in its meeting held on 29-12-2007 has approved revision in family pension in our Bank on the same lines as that applicable in the Nationalised Banks and as mentioned in the approval accorded by the GOI. The revised rates have been made effective from 01-05-2005 and Dearness relief on family pension is being paid on the same basis as that on pension and as per industry dearness relief rates.

However, the advices of revised Family pension were not given to the eligible pensioners/ family pensioners. On enquiry it has been advised by PPG Dept, Mumbai LHO that the advices have been uploaded on Bank's web-site 'sbitimes' and Bank has instructed Branch staff to go to the Bank's web-site 'www.sbitimes.com' and after following the under mentioned steps, please take two prints of the revised family pension advice of which **one should be given to the pensioner/ family pensioner against his/her acknowledgement and keep another copy to the respective files in the Branch for future reference**.

To take prints, the following steps should be taken by the Branch staff.

1) Visit Bank's web-site 'www.sbitimes.com'
2) then go to 'Mumbai Circle' menu,
3) then go to the PP&G Dept's link,
4) then click on Branch code number,
5) Here, you will see a folder "Family Pension",
6) then double click on the'Family Pension' folder,
7) On search option - type Prov. Fund Index number (do not type leading zeroes)
8) Here, you will find respective pensioner's advice of revised family pension.
9) Please take two prints and do the needful as mentioned above.

Please go to the Pension paying branch and request the concerned staff to follow the above instructions and get your advice of revised family pension.

When you get the advice, please verify whether name of your spouse is given in it. If not, please write a letter addressed to the PP&G Dept, Mumbai LHO, giving full name of your spouse and her / his Date of Birth with a request to incorporate the same with PPG Dept's records and issue fresh Family Pension Advice after incorporating the name of your spouse. You may send a copy of old family pension advice wherein name of the spouse has already been recorded for ready reference of LHO.

**********************************************

## फॅमिली पेन्शन रिव्हिजन

आपल्या बँकेने, इतर बँकांच्या धर्तीवर गव्हर्नमेंटने मंजुरी दिलेल्या फार्म्युल्यानुसार १ मे २००५ पासून सुधारित फॅमिली पेन्शन (रिव्हाइज्ड फॅमिली पेन्शन) लागू केले आहे. व त्याप्रमाणे सध्याच्या फॅमिली पेन्शनर्सना (जे एलिजिबल आहेत अशांना) रिव्हाइज्ड पेन्शन लागू केले आहे व ॲरिअर्स त्यांच्या खात्यावर जमा केले आहेत. परंतु अशा एलिजिबल फॅमिली पेन्शनर्सना रिव्हाइज्ड बेसिक फॅमिली पेन्शन काय झाले आहे याबद्दलचे ॲडव्हाइस दिले नव्हते. बँकेकडे चौकशी केल्यावर असे सांगण्यात आले कीं सदरहू ॲडव्हाइसेस हे बँकेच्या वेबसाइटवर आत्ता टाकले आहेत व संबंधित सर्व ब्रँच स्टाफने खाली नमूद केलेल्या प्रोसिजरप्रमाणे बँकेच्या **www.sbitimes.com** या वेबसाइटवर जाऊन ॲडव्हाइसच्या दोन प्रति छापून, त्यापैकी एक प्रत पेन्शनरला देऊन दुसरी प्रत त्याच्या व्यक्तिगत फाईलमधे फाइल करावी अशा सूचना दिल्या आहेत.

त्याचबरोबर जे पेन्शनर हयात आहेत त्यांचेसुद्धा रिव्हाइज्ड फॅमिली पेन्शन ॲडव्हाइसेसचे प्रिंटस् काढून ज्याचे त्याला द्यावेत अशा सूचनासुद्धा ब्रँचेसना दिल्या आहेत.

तरी पेन्शनर्सनी/फॅमिली पेन्शनर्सनी आपआपल्या पेन्शनपेअिंग ब्रँचमध्ये जाऊन रिव्हाइज्ड फॅमिली पेन्शनचे ॲडव्हाइस संबंधित स्टाफकडे मागावेत व ते मिळाल्यावर घरी जपून ठेवावेत. जर संबंधित स्टाफला प्रोसिजर माहिती नसेल तर ‘संवाद’ चा हा अंक दाखवून आपले काम करून घ्यावे. ब्रँच स्टाफने खालील प्रोसिजरप्रमाणे काम करावे.

१) बँकेची वेबसाइट www.sbitimes.com उघडावी.
२) त्यानंतर ‘मुंबई सर्कल’ या मेनूवर जावे.
३) त्यानंतर ‘पी.पी.जी.डिपार्टमेंट’ च्या लिंकवर क्लिक करावे.
४) त्यानंतर आपआपल्या ब्रँचच्या कोड नंबरवर क्लिक करावे.

५) पुढील स्क्रीन उघडल्यावर आपणांस 'फॅमिली पेन्शन' या नांवाचे फोल्डर दिसेल,

६) त्या 'फॅमिली पेन्शन' फोल्डरवर डबल् क्लिक करावे,

७) तेथे सर्च ऑप्शन मध्ये पेन्शनरचा प्रॉव्हिडंट फंड इंडेक्स नंबर (सुरूवातीचे झिरोज सोडून) टाईप करावा,

८) ह्याठिकाणी आल्यावर आपणास रिव्हाइज्ड फॅमिली पेन्शनचा ॲडव्हाइस दिसेल, त्याच्या दोन प्रिंटस् काढाव्यात व वर सांगितल्याप्रमाणे एक प्रत पेन्शनर/फॅमिली पेन्शनरला द्यावी व दुसरी प्रत त्याच्या फाइलमध्ये फाइल करावी.

वरीलप्रमाणे पेन्शनपेइंग ब्रॅचला जाऊन आपला ॲडव्हाइस मिळवावा व तो घरी जपून ठेवावा.

आपला ॲडव्हाइस मिळाल्यावर त्यात आपल्या स्पाऊसचे (पत्निचे/पतिचे) नांव दिले आहे की नाही हे तपासून पहावे. जर आपल्या स्पाऊसचे नांव नसेल तर पी.पी.जी. डिपार्टमेंटला आपल्या पेन्शनपेइंग ब्रॅच मार्फत अर्ज करावा. त्या अर्जात आपल्या स्पाऊसचे संपूर्ण नांव व जन्मतारीख बॅंकेला कळवून हा तपशील फॅमिली पेन्शन ॲडव्हाइसमध्ये समाविष्ट करून सुधारित ॲडव्हाइस पाठविण्याची विनंती करून बॅंकेचे रेकॉर्ड अप-टु-डेट करण्याची विनंती करावी, जेणे करून पेन्शनरचे पश्चात फॅमिली पेन्शनरला त्रास होणार नाही.


मध्यमवर्गीयांसाठी डिलक्स सहली

राजगुरु टुर्स

जिव्हाळा जपणारी माणसं...

| | Package Min 4 Pax | Conducted |
|---|---|---|
| काश्मिर-वैष्णोदेवी | ₹ 11,975/- | ₹ 17,975/- |
| सिमला-मनाली-चंदीगड (AC) | ₹ 12,475/- | ₹ 18,475/- |
| नैनीताल-कॉर्बेट-मसुरी (AC) | ₹ 11,475/- | ₹ 19,975/- |
| दार्जिलींग-सिक्किम-गंगटोक | ₹ 10,975/- | ₹ 16,975/- |
| केरळ बॅकवॉटर्स (AC) | ₹ 9,975/- | ₹ 15,475/- |
| हैद्राबाद-रामोजी-श्रीशैल्य | ₹ 8,975/- | ₹ 12,475/- |
| राजस्थान - मेवाड | ₹ 9,975/- | ₹ 13,975/- |
| लेह - लडाख | ₹ 19,975/- | ₹ 34,975/- |
| भूतान | ₹ 15,475/- | ₹ 19,975/- |

Dis. 1000 to 3000 upto 15 Feb.

+ स्टेट बॅंक स्टाफ व पेन्शनर्सना विशेष सवलत

मुंबई :022 - 24318082 / 24381026

संपर्क : राजन पाडलोसकर -9322231216

www.rajgurutours.com


We give below an Appeal made by son of our late-pensioner member Shri.M.A.Lonkar, retd. AGM. Those interested may contact him on his given e-mail address / Mobile

**********

## An Appeal for Kidney Donation

"Chintamani Lonkar , 31 year old Indian citizen and California resident, working for a high tech company, have been diagnosed with stage V kidney disease (Chronic Kidney Disease). This is an appeal for a **willing donor to give the Gift of life/ kidney**.

This is an appeal for those willing to help out a patient in need of an O(+ve) Blood group kidney. If you are interested you can contact at "help.chintamani@gmail.com" or Mobile -09169523218 for additional information"

## अभिनंदनीय

आपले रेवदंडा ता. अलिबाग, जि. रायगड येथील सभासद श्री. सुभाष चिटणीस हे गेल्या १० वर्षांपासून रेवदंडा येथे ज्येष्ठ नागरिक संघाचे काम समर्थपणे करीत आहेत. त्यांच्या या कार्याचा गौरव International Longevity Centre India ने केला व त्यांना स्व. बी. जी. देशमुख जीवन गौरव पुरस्कार २०११-१२ साठी श्री. नारायण मूर्ती (इन्फोसिस) यांच्या हस्ते पुणे येथे १७ डिसेंबर रोजी प्रदान करण्यात आला. श्री.चिटणीस यांना त्यांच्या सामाजिक कार्यासाठी आमच्या शुभेच्छा व हार्दिक अभिनंदन.

\- सेक्रेटरी

## Supreme Court Case 184 of 2011 - Latest position is as under

ITEM NO. 55 COURT NO.4 SECTION X

S U P R E M E C O U R T O F I N D I A

RECORD OF PROCEEDINGS

WRIT PETITION (CIVIL) NO. 184 OF 2011

FEDERATION O SBI PENSIONERS ASS.&ORS. Petitioner(s)

VERSUS

UNION OF INDIA & ORS. Respondent(s)

(With office report)

Date: 16/01/2012 This Petition was called on for hearing today.

CORAM :

HON'BLE MR. JUSTICE D.K. JAIN
HON'BLE MR. JUSTICE ANIL R. DAVE

For Petitioner(s) Mr. K.K. Venugopal, Sr. Adv.
Mr. E.C. Vidya Sagar,Adv.
Mr. Gopal Sankaranarayanan, Adv.
Mr. Bramjeet Mishra, Adv.
Mr. B.K. Choudhary, Adv.

For Respondent(s) rrs. 3 & 4 Mr. Harish N. Salve, Sr. Adv.
Mr. Sanjay Kapur,Adv.
Mr. Nikhil Danak, Adv.
Ms. Ashmi Mohan, Adv.

UPON hearing counsel the Court made the following

O R D E R

Despite service, no one has put in appearance on behalf of the Union of India. In the interest of justice we defer orders as we have been assured by Mr. Bhattacharyya, learned A.S.G. that the Union of India shall respond to the petition.

Let counter affidavit on behalf of the Union of India be filed within four weeks. Rejoinder affidavit, if necessary, may be filed within two weeks thereafter.

List thereafter.*

( Charanjeet Kaur ) ( Kusum Gulati )
Court Master Court Master

*************************************************

# * The Next Date of Listing is 12-03-2012

## State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle) Pune
## Nagpur Zonal Sub-Centre

### For information of Members from Nagpur Unit :

### (comprising Nagpur Dist. & Chandrapur, Gadchiroli, Gondia, Bhandara Dists only)

Pursuant to the decision taken in the meeting of Circle Managing Committee, it has been decided to hold Biennial Elections of entire Nagpur Zonal Sub-Centre before end of June 2012. Before that we will have to conduct Biennial Elections for **Nagpur Unit** comprising Nagpur District & Chandrapur, Gadchiroli, Gondia and Bhandara Districts only as under. The elections of office-bearers of **entire Nagpur Zonal Sub-Centre** will be held in due course before end of June 2012. The programme of Elections for entire Nagpur ZSC will be published in due course. For the purpose of holding the Elections, the Election Officer will be appointed.

The Nagpur District Managing Committee will consist of the following posts.

1) President; 2) Vice-President; 3) Secretary; 4) Joint Secretary 5) Treasurer and
6) Four Committee members for Nagpur Unit.

For the above 9 posts for Nagpur Unit, the members from the above mentioned Districts only (i.e. Nagpur, Chandrapur, Bhandara, Gondia and Gadchiroli Districts) will have voting rights and also they will be eligible to contest the Elections for above mentioned posts. Nominations are, therefore, invited for the above 9 posts from the eligible members (i.e. members drawing pension from the branches of above five Districts).

The relative format for submitting Nominations for any of the above Posts are available with Shri.S.G.Desai, President (Mobile No-09422189095) and Shri.J.S.Vakil, Secretary (Phone No-0712-2455404).

The last date for receipt of Nominations will be 21st February 2012 and the last date for withdrawal of Nomination will be 29th February 2012.

The Nominations as well as withdrawal forms should be sent to the following address prior to the dates indicated above by Registred Post / Speed Post / Courier or by Hand Delivery.

Address for submission of above : The Secretary, SBI Pensioners' Association,
Nagpur Zonal Sub-centre C/o Vakil's Bungalow,
Congress Nagar, Nagpur - 440012; Ph.0712-2455404.

***- J.S.Vakil,*** *Secretary*

*****************************************************************

**"Jana Gana Mana"- national anthem composed by Gurudev Tagore was first sung in Kolkata on 27th Dec 1911 in Indian National Congress session & it became national anthem in 1950. It is 100 yrs old as on 27th December 2011.**

***- S.V.Naik,*** Mumbai
(M) - 09821127616

### अभिनंदनीय

कोल्हापूर येथील आपले सभासद श्री. बी. के. गायकवाड यांचा मुलगा डॉ. किरण याची ॲग्रिकल्चरल सायंटिस्ट म्हणून भारत सरकारच्या कृषि खात्यात नुकतीच निवड झाली आहे. डॉ. किरण याचे या सुयशाबद्दल असोसिएशनतर्फे अभिनंदन.

– सेक्रेटरी

## SBI Pensioners' Cultural Mandal Thane - Mulund

S.B.I. Pensioners' Cultural Mandal Thane-Mulund had published an appeal in Samvad October 2011 to all members in Thane-Mulund area to volunteer for a Support Group. A heartwarming number of volunteers came forth and Support Groups have been formally established on Jan 13th 2012 for both Thane and Mulund. On this occasion a Booklet was brought out by the Mandal as a ready referrer. The Booklet includes very important telephone numbers like Police Stations, Hospitals, Fire Brigades, Laboratories, Medical Aids, Blood Banks, Ambulances/Hearses, Domestic Help, Day & Night Chemists, the telephone numbers of all the initial volunteers etc. Already the Mandal is working on a supplement in view of the day by day addition to the list of volunteers! The Booklet was formally released in a special function on that day at the hands of Shri V.M.Gokhale, President, Mumbai Circle. complimenting the Mandal on its unique efforts. Shri Gokhale exhorted the volunteers to come together as one family and extend a helping hand at any time of need to our members and their families.

Shri Gokhale announced that, looking to the special efforts put in by the Mandal for such a noble cause, SBI Pensioners' Association, Mumbai Circle has granted a sum of Rs 5000/- as a grant towards meeting the cost of publication of the Booklet. The Mandal Secretary Shri Gadkari profusely thanked him for this generous gesture and assured that all efforts would be made to strengthen the Support Group and the assistance provided to the members.

Shri Gadkari has requested all the members in the Thane-Mulund area to take benefit of the Support Group at all times.

- **Sharad Gadkari,**
Secretary

**For information of members from Panaji (Goa) Module**

## Staff Welfare Activities

### Empanelment of Hospital for Post-Treatment Payment facility

It has been advised by our Panaji (Goa) Zonal Office vide its letter No.DGM/CMHR/781/00213 dt.5-12-2011 that they have entered into tie-up arrangement with

**RG Stone Urology & Laparoscopy Hospital, Porvorim**

for extending Post Treatment payment facility to :-

(a) Supervising Staff and their dependents for all ailments; and

(b) in respect of Award Staff members and their dependent family members for Kidney ailments only ; and

(c) also for retired staff members under SBIREMB Scheme.

The agreement has been entered into between the Bank and the Hospital on 01-12-2011. The member may avail of the facility **on production of the referral letter from the Bank's Medical Officer or Authorised Doctor of the Bank, designated for the purpose.**

Thuis is for information of our members.

I.H.Dias
Secretary, Panaji ZSC

## मकर संक्रांत

शांत कोमल सूर्यकिरण
तसे तुमचे नितळ मन
क्षणाक्षणांनी कणाकणांनी
तिळावरच्या साखरकणांनी
प्रेम-स्नेह आपुला जाऊ दे बहरूनी... जाऊ दे बहरूनी..

- **प्रकाश चित्रे**, कोल्हापूर
भ्रमणध्वनी - ९९२२६२६२००

# युनिट वार्ता

## अंधेरी युनिट -

आपल्या अंधेरी युनिटच्या वतीने अंधेरी येथील कोकिळाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटल व असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२० ऑक्टोबर २०११ रोजी Cardiologist, Orthopaedics and Oncologist ह्या विषयांवर हॉस्पिटलच्या निष्णात डॉक्टरांद्वारे व्याख्याने आयोजित केली होती. अंधेरी पूर्व व पश्चिम विभागातील जवळपास पन्नास सभासदांनी या चित्रफितीसहित सविस्तर माहिती असलेल्या उद्‌बोधक व्याख्यानांचा लाभ घेतला. ह्या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन मुंबई झोनचे सेक्रेटरी श्री. माधव नाडकर्णी यांनी केले होते. सर्वश्री निळकंठ फाटक व श्रीकांत दाबके या स्थानिक कार्यकर्त्यांनी सक्रीय भाग घेऊन चांगले योगदान दिले.

- सेक्रेटरी, अंधेरी युनीट

************

## डोंबिवली युनिट -

आपल्या डोंबिवली युनिटची वार्षिक सभा गुरूवार दि.२४ नोव्हेंबर २०११ रोजी दुपारी ४॥ वाजता स्टेट बँकेच्या डोंबिवली (पूर्व) शाखेत संपन्न झाली. सभेला १०४ सभासद उपस्थित होते. त्यात महिलांची संख्या लक्षणीय होती. या सभेस विशेष अतिथि म्हणून असोसिएशनचे सर्वश्री बाळासाहेब दांडेकर (फेडरेशन सल्लागार), व्ही.एम.गोखले (सर्कल अध्यक्ष), एस.बी.गोखले (मुंबई विभागाचे अध्यक्ष), एस.बी.पुसाळकर (मुंबई विभागाचे ट्रेझरर), बी.पी.खरे (मुंबई विभागाचे सेक्रेटरी), तसेच श्री.प्रकाश सांगले (शाखाधिकारी व स्टेट बँक ऑफिसर्स असोसिएशन, मुंबई विभागाचे चीफ रीजनल सेक्रेटरी) हे मान्यवर उपस्थित होते. सभेला श्री.दिलीप मोदी, सहा.महाप्रबंधक हे उपस्थित राहणार होते पण मुंबई परिसरातील रास्तारोको आंदोलनामुळे सभेस हजर राहू शकले नाहीत.

श्री.सुभाष आगरकर, विभागीय सेक्रेटरी (डोंबिवली विभाग) यांनी सर्व मान्यवरांचे व उपस्थित सभासदांचे स्वागत केल्यावर श्री.सांगलेसाहेबांचे हस्ते मान्यवरांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या सभेचे प्रसंगी बँकेच्या अधिकाऱ्यांनी ग्रीन चॅनल, स्टेट बँक लाइफ इन्शुरन्स, मोबाईल बँकिंग इत्यादी बँकेच्या विविध योजनांची माहिती दिली. त्यानंतर श्री.व्ही.एम.गोखले यांनी आपल्या भाषणात सभेतील उत्तम उपस्थितीबद्दल समाधान व्यक्त करून सभेत उत्स्फूर्तपणे जमलेल्या रु.१७,५००/- च्या देणगीबद्दल सर्व सभासदांचे कौतुक केले. त्यात प्रामुख्याने श्री.एस.पी.देशमुख व श्रीमती विजया कर्वे यांनी दिलेल्या विशेष देणगीचा उल्लेख करावा लागेल. सभेत सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांना श्री.गोखलेसाहेबांनी आपल्या भाषणात उत्तरे देऊन सर्वांचे समाधान केले.

श्री.जांदे यांनी सुप्रीम कोर्टाच्या केससंदर्भात विचारलेल्या प्रश्नाला श्री.दांडेकरसाहेबांनी सविस्तर उत्तर देऊन त्यांच्या व इतर सभासदांच्या मनातील शंकांचे उत्तमप्रकारे निरसन केले. २०१२ या वर्षात या केसचा निकाल आपल्या बाजूने लागेल व बहुतांश सभासदांचा फायदा होईल अशी अपेक्षा व्यक्त केली. तसेच जुलै व ऑगस्ट २०११ च्या संवाद अंकातील असोसिएशनने आत्तापर्यंत काय काय केले याची त्यांनी दिलेली तारिखवार माहिती सर्वांनी वाचावी व कोणाच्याही गैरप्रचाराला थारा देऊ नये असे सांगितले. सभेतील उपस्थिती पाहून श्री.दांडेकरसाहेबांनीही खूप समाधान व्यक्त केले. तसेच भाषणाचे शेवटी सर्वांनी नेत्रदान करावे असे आवाहनही केले.

श्री.चितळे यांनी प्रातिनिधिक प्रश्न म्हणून विचारले की, हल्ली सर्वच डॉक्टर्स एच्.आय.व्ही. टेस्ट करावयास सांगतात. तेव्हा त्याचा खर्च बँकेकडून, मेडिकल कोट्याव्यतिरिक्त, मिळावा अशी अपेक्षा व्यक्त केली. एस.बी.गोखले यांनी, ही सूचना बँकेच्या संबंधित अधिकाऱ्यांपुढे मांडून मंजुरीसाठी प्रयत्न करू असे आपल्या भाषणात सांगितले.

डोंबिवली येथील बँकेची डिस्पेन्सरी जुनी असून जवळ-जवळ सर्व सभासद त्याचा फायदा घेतात व तेथील सेवेबद्दल सर्वजण समाधानी आहेत. श्री.जांदे यांनी बऱ्याच सभासदांच्या सह्या असलेले एक जॉइंट रिप्रेझेंटेशन श्री.एस.बी.गोखले यांचेकडे दिले. त्यात बँकेला अशी विनंती केली आहे की, महिन्यातून एक दिवस तरी डिस्पेन्सरीत स्पेशालिस्ट डॉक्टर्स/कन्सल्टंटची सुविधा उपलब्ध करावी. श्री.गोखले यांनी हा विषय पुढील स्ट्रक्चर्ड मिटिंगमधे घेऊ असे सांगितले. त्यानंतर सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांना असोसिएशन पदाधिकाऱ्यांनी उत्तरें दिली. तसेच बँकेसंबंधीच्या प्रश्नांना शाखाधिकारी श्री.सांगलेसाहेबांनी दिली.

डोंबिवली येथील एक सभासद श्री.विनायक जोशी यांच्या 'साकड' कवितेसाठी त्यांना मनोयुवाचा २०११ साठीचा साहित्य पुरस्कार, महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघाच्या सोलापूर येथील दहाव्या मेळाव्यात देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. तसेच सोलापूर आकाशवाणी केंद्रावर १७-०९-२०११ रोजी देहदान या विषयावर भाषण झाले. श्री.जोशी यांच्या या विशेष उपलब्धिवर सर्व सभासदांनी टाळ्यांच्या कडकडाटात अभिनंदन केले. (श्री.जोशी यांची 'साकड' ही कविता याच अंकात इतरत्र दिली आहे.) विशेष अतिथी, सर्व उपस्थित सभासदांचे व देणगीदारांचे श्री.आगरकर यांनी आभार मानले. श्री.सांगलेसाहेब व त्यांचे सहकाऱ्यांनी सभेची उत्तम व्यवस्था ठेवली म्हणून त्या सर्वांचेही आभार मानले. सभेचे शेवटी बँकेतर्फे अल्पोपहार व चहापानाची व्यवस्था केली होती. सभेच्या सुनियोजनात श्री.जमदग्नी, श्री.रणदिवे व श्री.तेलवणे यांची मोलाची मदत झाली.

सुभाष आगरकर
विभागीय चिटणीस

*****************

# वाद ! संवाद !! वितंडवाद !!!

दि. ११ जुलै २००६ रोजी अमरावतीहून महाराष्ट्र एक्सप्रेसने सोलापूर येथे दि. १३ जुलै २००६ ला होणाऱ्या पेन्शनर्स असोसिएशनच्या वार्षिक आमसभेला अमरावती युनिटचा पदाधिकारी तसेच संघटनेचा आजीव सदस्य असल्याने व सेवानिवृत्त झाल्यापासून दरसाल वार्षिक आमसभेस उपस्थित राहण्याचा परिपाठ असल्याने प्रवासास निघालो होतो. प्रवासात संघटनेच्या नागपूर सबझोनलचे सचिव श्री.वकील सोडून इतर पदाधिकारी व आणखी काही नागपूर पेन्शनर्स क्लबचे पदाधिकारी व सदस्य सहप्रवासी होते. त्यात उल्लेखनीय म्हणजे सर्वश्री कोल्हटकर, डेहणकर, सोमकुवर, कुळकर्णी, पिंपळापूरे, पात्रीकर, पांढरे व अकोल्याचे श्री. नागराज आणि इतर असा एकूण १२ ते १५ जणांचा समावेश होता. ही सर्व पार्श्वभूमी विस्ताराने सांगण्याचा उद्देश असा की, नागपूर सबझोनल सेंटर व नागपूर पेन्शनर्स क्लबच्या वाटचालीसंबंधी तसेच कार्यकर्त्यांच्या/पदाधिकाऱ्यांच्या कार्यक्षमतेविषयीच्या-कार्यपध्दतीविषयीच्या किंबहूना त्यांच्या वैयक्तिक गुणावगुणांची-पक्षी श्री.जयंत वकील यांच्या विरूध्द-चर्चा देखील सर्वजण मोठ्या चवीने करीत होते. वास्तविक असे करणे शिष्टाचाराला धरून नव्हते. असे करणे गैर आहे हे चर्चेत सहभागी सर्वांनाच माहीत होते. कळते पण वळत नाही म्हणतात तसेच काहीसे चालू होते. मुद्दा असा की, नागपूर सबसेंटर व एस.बी.आय. पेन्शनर्स क्लब, यांच्यात नागपूरच्या कारभाराविषयी तेव्हापासून एकमेकात वितुष्ट आहे. केवळ तात्विक मतभेद असते तर ते केव्हाच संपुष्टात आले असते. पण येथे असे तात्विक मतभेद नाहीतच. आहे तो एककमेकांविषयीचा पूर्वग्रहदूषित दृष्टिकोन. त्यातही तेव्हाचे असोसिएशनच्या सब सेंटरचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व त्यावेळी श्री.एकनाथजी ठाकूर पुरस्कृत 'श्री.एन.जी.मोरे सर्व्हीस ॲवॉर्ड' च्या निमित्ताने निर्माण झालेली सल्लागार समिती विरुध्द सबसेंटर क्लबचे त्यावेळचे सचिव श्री.वकील यांच्यातच हा संघर्ष होता व आजचीही परिस्थिती काही फार वेगळी आहे असे नाही. तेव्हा असोसिएशनच्या नागपूर सबसेंटरची व एस.बी.आय. पेन्शनर्स क्लब, नागपूरची कार्यकारिणी एकच असल्याने व सर्व अधिकार एकाच ठिकाणी केंद्रीत झाल्याने ही धूसफूस असावी असे वाटत होते. पण नंतर दोन वर्षांनी म्हणजे जुलै-ऑगस्ट २००८ मध्ये सर्व संमतीने व लोकशाही पध्दतीने निवडणूक होवून श्री.वकील यांना पुन्हा सचिव म्हणून केवळ नागपूरातूनच नव्हे तर सबंध विदर्भातून सदस्यांनी त्यांच्यावर विश्वास दर्शवून त्यांना व त्यांच्या सहकार्यांना एखाद दुसरा अपवाद वगळता निवडून दिले आहे. ही वस्तुस्थिती असतांना पराभूत सदस्यांनी खुल्या दिलाने पराभव मान्य न करता असा आक्रस्ताळेपणा का करावा, हे एक अगम्य कोडे आहे. शिवाय आता नागपूर क्लब व नागपूर सबझोनल सेंटर अशा दोन वेगवेगळ्या कार्यकारिणी आहेत ना? शिवाय ही काही कायम व्यवस्था नव्हती तर पुन्हा दोन वर्षानंतर नवीन कार्यकारिणी निवडण्याचा सदस्यांचा अधिकार अबाधीत होता.

बरे, श्री.वकील हे फक्त त्यांना ज्यांनी मत दिले त्यांच्याच प्रश्नात लक्ष घालतात व इतरांविषयी दुजाभाव ठेवतात असेही म्हणता येत नाही. कारण मतदान हे गुप्त होते. पण कटू असले तरी हे सत्य आहे की, अशी शंका घेणारे हे पराभूत उमेदवार व त्यांचे काही मोजके अनुयायी समर्थक आहेत. हेच त्यांच्या वर्तनावरून दिसत आहे. श्री.वकील यांच्या सचिव असण्याला त्यांचा विरोध हे त्यांचे अवघड जागेचे दुखणे झाले आहे. कारण श्री. वकील हे उतारवयातील आधीव्याधींकडे दुर्लक्ष करुन, कौटुंबिक आघाडीवरील समस्यांनाही धीराने तोंड देऊन संघटनेच्या कार्याला तेवढाच न्याय देत आहेत याची जाणीव इतर कार्यकर्त्यांनी आदर्शवत मान्य करण्यास प्रत्यवाय वाटत नाही. परंतु 'नागपूरकरांचा' वकील नको हा एकच नारा आहे व हे नागपूरातील इतर सर्व सामान्य सदस्य मानत नाहीत, म्हणून आता शेवटी मानसिक संतुलन गमावल्यासारखे केवळ विध्वंसक चाळे व त्रागा करीत आहेत. हे सर्व करीत असतांना ही मंडळी हे विसरले की या सर्व पत्रकबाजीमुळे संपूर्ण मुंबई सर्कलमध्ये आपण आपल्या नागपूर सबसेंटरची प्रतिमा मलीन केली आहे. इतकेच नाही तर बदनामीही केली आहे. पण आता जुन्या सर्व कटू घटनांना मूठमाती देऊन आपण सर्वांनी मिळून कोणतीच बाब जास्त न ताणता तसेच सर्वांनी आपआपल्या सर्व सहकाऱ्यांशी चर्चा करून खिलाडुवृत्तीचे दर्शन घडवावे व हेही लक्षात घ्यावे की, मुंबई व पुणे सबझोनल सेंटर्सच्या खालोखाल आपल्या नागपूर सबझोनल सेंटरची सदस्य संख्या आहे तीही कोणाला दुर्लक्षित करता येण्यासारखी नाही; म्हणून केवळ संघटनेसाठी तरी एकमेकांशी हातमिळवणी करुन नागपूरच नाही तर संपूर्ण वैदर्भियांना एका सूत्रात गोवण्यात यावे. यासाठी वितंडवाद न घालता वादातीत संवाद साधण्यासाठी साद द्यावी. तसेच गत काही महिन्यातील घटनांमुळे सबंध महाराष्ट्रात जे विश्वासाचे व अनिश्चिततेचे मळभ नागपूर सबझोनल सेंटरबद्दल निर्माण झाले असावे असे वाटते त्यावर पडदा टाकावा.

शेवटी पुन्हा एकदा नागपूरमधील संघटनेच्या ज्येष्ठ व श्रेष्ठांना विनंती की त्यांनी-त्यामध्ये प्रामुख्याने त्यांच्या बँकेतील कार्यकाळात बँकेमध्ये दीर्घकाळपर्यंत जवळजवळ सर्वच जबाबदारीची पदे भूषविली आहेत-त्यावेळी त्यांचा जो लौकिक होता, त्यांच्याविषयी सर्वसामान्य कर्मचाऱ्यांमध्ये त्यांना जो आदरयुक्त मान होता त्याला आता आयुष्याच्या संध्याकाळी तरी गालबोट लागू देऊ नये असे वाटते. म्हणूनच हा सर्व खटाटोप व लहानतोंडी मोठा घास घेण्याचे धारिष्ट्य केले आहे. ह्यात कोणालाही दूषण देऊन

त्यांचे उणेपण दाखविण्याचा, तसेच कोणाचीही भलामण करून त्याला मोठेपणा देण्याचाहि हेतू नाही. हे सर्व सहकारी सदस्य बंधूंनी कृपया लक्षात घ्यावे आणि अशीही सूचना करावी वाटते की, आगामी जुलै-ऑगस्ट मध्ये होणाऱ्या सर्कल ए.जी.एम्.पूर्वी नागपूर सबझोनल सेंटरची वार्षिक सभा घेऊन नवीन कार्यकारिणी निवडावी व सबंध महाराष्ट्राला विदर्भातील एकोप्याचे दर्शन घडवीत या मानापमान नाटकाचा संशयकल्लोळ थांबवावा. माझे हे उपरोक्त निवेदन सर्वांनाच भावेल अशी मुळीच अपेक्षा नाही. त्यात काही दोष असतील व ते दाखविले तर मला आनंदच होईल. पण केवळ दोष दिग्दर्शन न करता त्यावरील उपाय शोधून संघटना, संघटनेचे आजी, माजी व भावी पदाधिकारी, कार्यकर्ते व इतर सामान्य सदस्य यांच्या मनामनाचा मेळ जुळवून संवादच नव्हे तर सुसंवाद घडवावा, ही अपेक्षा. तूर्तास एवढेच.

- अविनाश निमदेव, अमरावती

मो. - ०८३०८६७३७३५

********************

## साकड

आकाशीचा मेघ सांगतो
वांझ ढगांच्या सांज कथा
व्याकुळ होऊनी धरतीवरती
गाऊनी वारा मांडी व्यथा ।।१।।

कृषकाचे मग लक्ष नभावरी
अन् मूषकाचे राही धान्यावरी
मिळून दोघे साद घालती
अगतिक होऊनी वरुणा धरी ।।२।।

धाय मोकलुनी अकांडतांडव
करती पोरे घरोघरी
परि दया ना वांझ ढगांना
उडोनी जाती दूरवरी ।।३।।

इंद्राला येई मग कळवळा
हुकूम सुटे तो वरुणाला
धरती वरती बरसती धारा
तृप्त कराया तृषितांना ।।४।।

- **विनायक जोशी**, डोंबिवली

मो. - ०९३२४३२४१५७

## वरना हम भी.....

मिर्ज़ा गालिब यांचा एक शेर फारच प्रसिद्ध आहे तो असा
इश्क ने 'गालिब' निकम्मा कर दिया
वरना हम भी आदमी थे काम के

त्यावरून आम्हालाही या वयात काही शेर सुचले ते मिर्ज़ा गालिब यांची क्षमा मागून सादर करतो, गौर फर्माइये!

१) उम्र ने हमे एक जगह बिठा के रख दिया
वरना हम भी घुमते थे 'दिवानों' की तरह ।।

२) घुटनों के दर्द ने हमको परेशां कर दिया
वरना हम भी दौडते थे 'घोडों' की तरह ।।

३) दातोंने मूँह को अलविदा कह दिया
वरना हम भी 'मटन' चबाते थे 'शेरों' की तरह ।।

४) शरीर थक चुका कुछ काम अब होता नहीं
वरना हम भी जूझते थे 'बैलों की' तरह ।।

५) खाँसी ने गले को परेशान कर दिया
वरना हम भी गाते थे 'रफी और मन्ना डे' की तरह ।।

६) बालों ने सर को गंजा करके छोड दिया
वरना हम भी 'कोंबडा' रखते थे 'देवानंद' की तरह ।।

७) जैसे बीते बचपन और जवानी के दिन 'बेताब'
कट जायेंगे बाकी भी ढलते सुरज की तरह ।।

- 'बेताब' अमलनेरी अर्थात **वसंत धुपकर**

भ्रमणध्वनी - ९१५८००७८३१

## प्रतिक्रिया

आपल्या नोव्हेंबर महिन्याच्या 'संवाद' मासिकातील "G.M (o) की गाडी हा श्री. ललिंगकर यांचा विनोदी लेख वाचला व खूप आवडला. सहसा वाचण्यात येणारे विनोदी साहित्य हे काल्पनिक स्वरूपाचे व्यक्तीनिष्ठ, शब्दनिष्ठ व शाब्दिक कोट्यांवर आधारित असते. पण प्रसंगनिष्ठ विनोद साध्या व सोप्या भाषेत श्री. ललिंगकरांनी व्यक्त केला आहे. बँकेच्या साचेबद्ध कामाव्यतिरिक्त त्यांनी फोटोग्राफीचा छंद जोपासला त्याबद्दल त्यांचे अभिनंदन.

**- सौ. कुंदा गो. मुळे**

भ्रमणध्वनी - ९८९०८६३८६९

With Best Compliments from:

**Shreekant V. Pai Bir** — Chairman

**Sachin S. Pai Bir** — Managing Partner

# M/s. VishwaMukta Associates
# Mapusa - Goa

*Units* :

# HOTEL BLESSINGS

**M. G. Road, Lane II,**
**Behind Shiv Sagar Restaurant,**
**Near Rizvi Chambers,**
**Panaji, Goa - 403 001.**
**Ph.: (0832) 2222546, 2224770, 6514146**
**Fax: 2222547 Email: hotelblessings@yahoo.com**
**www.hotelblessingsgoa.com**

# HOTEL ASHIRWAD

**Chogm Road, Bhd Holy Family Church,**
**Opp. Techno Park, Alto-Porvorim,**
**Bardez, Goa - 403 521.**
**Ph.: (0832) 2901135, 6453205**
**ashirwadgoa@yahoo.com**
**www.hotelashirwadgoa.com**

# BHOJAN

**INDIAN | GOAN | CHINESE | TANDOOR**
**Multi Cuisine Veg/Non Veg Restaurant with Bar**
**Hotel Ashirwad, Chogm Road, Alto - Porvorim, Bardez, Goa - 403521**
**Ph. (0832) 6453525, 2901600**
**E-Mail: bhojan6453525@rediffmail.com**
**www.bhojangoa.com**

# संवाद लेखस्पर्धा २०१२

दर वर्षीप्रमाणे यंदाही 'संवाद' तर्फे लेख स्पर्धा २०१२ जाहीर करताना विशेष आनंद होत आहे. या स्पर्धेत जास्तीत जास्त सभासद/सहसभासद भाग घेऊन ती यशस्वी करतील अशी आशा आहे.

**स्पर्धेसंबंधी माहिती -**

१) **विषय -** (१) मागे वळून बघताना....

(सुखी आणि समाधानी निवृत्तीनंतरचे जीवन- माझे अनुभव)

किंवा

(२) मी जोपासलेले छंद

२) **शब्द मर्यादा -** आठशे ते एक हजार शब्द

३) **लेख पाठविण्याची अंतिम मुदत -** ३१ मार्च २०१२

स्पर्धेसाठीचे सर्व लेख ३१ मार्च २०१२ पर्यंतच आमचेकडे पोचतील अशा बेताने पाठवावेत. कोणत्याही कारणास्तव अंतिम मुदत वाढविली जाणार नाही.

४) **पारितोषिकांचे स्वरूप -**

**पुरुष विभाग -** प्रथम क्रमांक रु. ५००/-
द्वितीय क्रमांक रु. ३००/-
तृतीय क्रमांक रु. २००/-

**स्त्री विभाग -** प्रथम क्रमांक रु. ५००/-
द्वितीय क्रमांक रु. ३००/-
तृतीय क्रमांक रु. २००/-

**इतर महत्त्वाच्या सूचना -**

१) ही स्पर्धा केवळ स्टेट बँक ऑफ इंडिया पेन्शनर्स असोसिएशनच्या सभासदांसाठी व सहसभासदांसाठीच आहे.

२) लेखन आखीव फुलस्केप (पांढरा कागद) कागदावरच भरपूर समास सोडून, दोन ओळीत जास्तीत जास्त अंतर सोडून कागदाच्या एकाच बाजूस लिहिलेले असावे. पाठपोट लिहू नये. अक्षर वाचनीय असावे. लेखाच्या सुरुवातीस उजवीकडील कोपऱ्यात लेखकाने आपले संपूर्ण नाव, पूर्ण पत्ता (पिनकोड नंबर सहित) सभासद क्रमांक, तारीख व फोन नंबर लिहावा. लेखाच्या शेवटी आपली सही, त्याखाली आपले संपूर्ण नाव, पूर्ण पत्ता, फोन नंबरसहित लिहिणे आवश्यक आहे.

३) लेखाची मूळ प्रतच पाठवावी. झेरॉक्स, कार्बनप्रत पाठवू नये.

४) स्पर्धेसाठी लेख पाठवताना पाकिटावर मोठ्या अक्षरात 'संवाद लेख स्पर्धा २०१२ असा स्पष्ट उल्लेख करून पुरेसे पोस्टेज लावूनच असोसिएशनच्या पुणे येथील पत्त्यावर पाठवावा. लेखाबरोबर इतर साहित्य, असोसिएशन संबंधीचा मजकूर पाठवू नये. त्यासाठी स्वतंत्र पाकिट पाठवावे.

५) ज्या सभासदांना/सह सभासदांना 'संवाद लेख स्पर्धे' त यापूर्वी पारितोषिक मिळाले आहे अशा सभासदांनी/सहसभासदांनी स्पर्धेसाठी लेख पाठवू नये.

६) स्पर्धेसाठी लेख पाठवताना स्पर्धेसंबंधीचे सर्व नियम व अटींचे पालन केल्याची खात्री करूनच लेख पाठवावेत. सूचना व अटींचे उल्लंघन करून पाठवलेल्या लेखांचा स्पर्धेसाठी विचार केला जाणार नाही. याची लेखक सभासदांनी नोंद घ्यावी.

७) संपादक मंडळाचा निर्णय अंतिम राहील.

स्पर्धेचा निकाल मे २०१२ च्या 'संवाद' मध्ये प्रसिद्ध होईल. विजेत्यांना पारितोषिके या वर्षीच्या सर्वसाधारण सभेत अध्यक्षांच्या हस्ते प्रदान करण्यात येतील.

**- संपादक मंडळ** (संवाद)

## *नवयुवक*

नवतेजस नवयुवक मी
प्रवर्तक नवयुगाचा होणार!
पंचप्राण हृदयी युवकांच्या फुंकणार!
दिवस सोनियाचे मातृभूमीत उगवणार! ।।धृ।।

प्रचंड उर्जा माझे ठायी
आत्मविश्वास उदंड सळसळतो देही।
गुणवत्तेला माझ्या नसे उणे
गातो मी 'परिश्रमाचे' गाणे
आव्हान कठोर मी स्विकारणार ।।१।।

गगनचुंबी मम आकांक्षा
नभोमंडळा भेदे महत्त्वाकांक्षा।
प्रेरणा थोरांच्या राष्ट्रप्रेमातून घेतो।
तिमिरातून मार्ग तेजाचा शोधतो।
वैभव भारतमातेचे मी वाढविणार ।।२।।

उमेद नवी मी जागवितो।
स्वप्नपूर्तीस्तव देहा झिजवितो।
निर्धारातून दृढनिर्धार पेटवितो
आव्हानाला प्रतिआव्हाने ललकारतो।
निर्भय राष्ट्र मी पुन्हा उभारणार ।।३।।

- **पी.बी.भेंडे**, पुसद, ✆ - ९५५२२१२१०१

## "THAT DAY WAS NOT FOR ME"

I, 69 years old retired person got up in the morning at usual time i.e. around 8 a.m. on that day. I was feeling much better, healthy and also in good mood. Those retired persons like me passed leisure time as they wish and/or as desired by their better half. Their daily routine... largely depends on their mood. It may not be the same mood.... sometimes good, feeling better or sometimes gloomy, not feeling healthy and is led on that day automatically. I am not an exception to this. On that day, I was in good mood, feeling extremely happy. I had planned the day on previous day. I was happy to know that to-day, I will carry out as have decided.

Now I narrate the happenings of the day.....

I am staying at S. V. Road, Borivali (West) for last 25 years. On that day I left the house at around 2 p.m. I got in a bus going towards east, purchased a day pass of Rs. 25/-. Normally I get down at Magathane Tel. Exch. stop. While going to down town, I usually get in Bus Route no. 440 which runs fast and also runs over flyovers. On the day, I got up from my seat and stood near front door of the bus, to get down. The bus was in motion. As the bus was approaching the desired stop, I saw one bus coming down from the flyover. I asked the driver which route it was. He told "B.R.440". I was happy that I would get the bus because it would stop just in front of my bus, at the bus stop. My bus reached the bus stop. By that time B.R.440 left for next stop. I did not get down. I was looking what the bus driver is doing now to get in from the backdoor. I was happy that I got B.R.440 without waiting for long. I got hold of the solid steel bar with my right hand at the entrance and at ease I reached my left hand to catch hold of the steel bar at the left. It was not to be. I found to my surprise that back door of the B.R. 440 was having a width larger than usual. I was struggling to catch hold of the left bar with my left hand and the bus started moving. My right hand which held the bar was stretched and I was feeling pain in my arm, I was dragged almost for 30 seconds; my both legs folded partially from the feet sweeping the road and left hand was searching the left side bar which I noticed, was far away. I was frightened, thinking had my right hand would slip...... The bus was speeding and passengers standing near the door, were shouting to stop the bus. Though I was nervous, sweating, I held the right side bar with solid grip and struggled to catch with my left hand the left side bar. I could luckily stand on the first step. Just then the bus stopped. My both hands holding left and right bars were so stretched horizontally because of applying emergency brakes while my body swung left/right for a moment like an indicator of big weighing machine. I was standing like CRUSIFORM. I got in the bus. I felt numbness in my both hands for few seconds. I could not bring my hands down and lift them for a while. Terrific paining I experienced. I saw that my cream colour pant was blackened from outside at left with road dirt. Passengers allowed me to sit comfortably; some also offered me water. I was frightened, nervous, sweating and my hands and legs were trembling and I wanted to erase those fearful 30 seconds as quickly as possible from my mind. What made me to catch B.R.400 in a such hurry? It might be a rush of moment born out of temptation. Normally I do not do that. In my life I have always avoided temptation, but on that fateful day, I did not know what happened to me. With minor bruises on my left leg, my right foot strained, both hands stretched with paining and my cream colour pant getting blackened, while I was feeling smart with white shirt which I wore putting inside before I left home; I was sitting in the bus bemused and letting myself convinced "TODAY WAS NOT FOR ME"

Cream colour pant and white shirt in; is my favourite dress for so many years. Recently my weight was also reduced. In effect circumference of my tummy was also reduced. So I decided to put myself in my favourite dress after many years. I was feeling comfortable and looking through mirror again and again, how I looked. I was happy and in great mood on that day while leaving my house. As we know such high of happiness generally indicates happening of something contrary to that mood only to make being realise that his feet must remain on the ground.

However, on that day, I went ahead and did my jobs as planned during the day and returned home at night with happy mood.

However, on that day, I went ahead and did my jobs as planned during the day and returned home at night with happy mood.

It was a lesson for me.... not to be sure off what will happen next moment, which we do not know. One should remain alert all the time.

- **Vishwas Kale**, Borivali West
M. - 9869420641

# संकल्प

नवं वर्ष सुरू झालं की एखादा संकल्प करायचा आणि थोड्याच काळात तो मोडून टाकायचा असाच संकल्प काहीजण करताना दिसतात. कोणताही संकल्प करताना 'मला', 'माझ्या'साठी अमुक करायचंय ही 'मी'पणाची भावना प्रत्येकाच्या मनात असते. फक्त स्वत:पुरतं बघणं ही स्वार्थी भूमिका आज बोकाळलेली दिसते. दुसऱ्यासाठी काहीतरी करायचं ही गोष्ट तर बाजूलाच पण दुसऱ्याचा विचारसुद्धा न करणं हे योग्य नव्हे.

काहीजण दुसऱ्याला स्वत:च्याच एखाद्या कामासाठी भेटण्याची वेळ देतात. पण ती वेळ न पाळता उलट तास दोन तास उशिरा पोहोचतात. दुसऱ्यालाही काही महत्त्वाची कामं असू शकतात, त्या कामांचीही ठराविक वेळ पाळणं त्यांना भाग असतं तरीही त्यांनी मधला वेळ आपल्याला दिलेला असतो हे त्यांच्या गावीही नसतं. दुसऱ्या व्यक्तीला आपण वेळ न पाळल्यामुळे त्याला दुसऱ्या कामांच्या वेळेची तडजोड करावी लागते ही बाबच त्यांच्या लक्षात येत नाही. उशीर होणार हे फोन करून कळवतही नाहीत. म्हणून प्रत्येकानं संकल्प करताना दुसऱ्याचा विचार करण्याची संकल्पना लक्षात ठेवायला हवी. दुसऱ्याला आपल्या मैत्रीची गरज आहे तशीच आपल्यालाही त्याच्या मैत्रीची गरज आहे ह्याचं भान ठेवणं आवश्यक आहे. मी मला हवं तेच करणार, हवं तसंच वागणार, त्यानं दुसऱ्याला काय वाटायचं ते वाटो किंवा घरादाराचं काय व्हायचं ते होवो ही वृत्तीच वाईट. आपल्या दगडाखाली सतत दुसऱ्याचे हात ठेवणं व त्यायोगे स्वत:चं महत्त्व वाढवण्याचा प्रयत्न करणं हे अत्यंत चुकीचं आहे. कोणत्याही प्रकारच्या अधिकाराचा हा दुरूपयोग आहे.

कधी कधी ह्याच्या बरोबर उलट बाजू समाजात प्रकर्षानं दिसते नि त्याचं दृश्य स्वरूप चढाओढ, स्पर्धा ह्या रूपात प्रत्ययाला येतं. निकोप स्पर्धा असायलाच हवी ह्याबद्दल कुणाचंच दुमत नसावं. पण परवडत नसताना दुसऱ्यासारखी मोटार, मोठं घर, दागिने घेणे, पार्ट्या देणं किंवा लग्न समारंभात जास्त जेवणाचे प्रकार ठेवणं किंवा वारेमाप सजावट करून पैशांची उधळपट्टी करणं हे ही अयोग्यच. स्पर्धा स्वत:ची स्वत:बरोबर असावी. आज चांगलं काम केलं तर उद्या ह्यापेक्षा जास्त चांगलं काम करू हा विचार हवा. पण चांगल्या कामाचे निकष चुकीचे असतील तर उपयोग नाही. हे निकष ठरवताना सापेक्ष विचार नसावा तर खुल्या मनाने विचार करावा.

आपण ज्या देशात राहतो, ज्या समाजात वावरतो त्या देशाची, त्या समाजाची प्रगती प्रत्येकानं आपापल्या परीनं खारीच्या वाट्यानं जरी करायचं ठरवलं तरी हा देश खूप वरच्या पातळीवर पोहोचेल, आपला समाज बरीच उन्नती करू शकेल यात शंका नाही. म्हणूनच स्वार्थ आणि परमार्थ ह्यातील सुवर्णमध्य गाठण्याचा संकल्प आपण ह्यावर्षी करू शकतो. ह्यासाठी प्रत्येकानं स्वत:ची आचारसंहिता ठरवून तपासून पाहणं अत्यंत गरजेचं आहे. अन्यथा फक्त स्वत:च्या पोळीवर तूप ओढून घेणं नि लोकांना दाखवायला भ्रष्टाचाराच्या विरूद्ध घोषणा देत मिरवणूकीत सामील होणं थांबणार नाही. आज देशाला विचारवंतांची गरज आहे. आपण आपल्या स्वत:पुरतं तरी खरं विचारवंत व्हावयास हवं. तरच संपूर्ण वर्षाचा संकल्प सार्थकी लागेल.

**- सौ. उज्ज्वल र. ब्रह्मांडकर**

# सुदेश भोसले - एक मानवतावादी कलाकार

नोव्हेंबर २०११ चा 'संवाद' हाती पडला आणि वाचून काढला. 'ग्रेट भेट-सदाबहार अशोक कुमारची' हा सुहास बोकील यांनी लिहिलेला लेख वाचून त्यांचे अशोक कुमारवरील प्रेम व त्यांची आत्मनिष्ठा यांचा प्रत्यय आला.

माझ्या बाबतही योगायोगाने एका महान कलाकाराच्या भेटीचा योग आला. त्यावेळी मी स्टेट बँक ऑफ इंडिया गोरेगाव (प.) येथे कॅशिअर या पदावर कार्यरत होते. आमच्या शाखेत प्रत्येक सहकाऱ्याचा वाढदिवस साजरा करीत असत. त्यावेळी वाढदिवस असणाऱ्या कर्मचाऱ्यास एक भेटकार्ड व एखादी लहान वस्तू भेट म्हणून देत असत. हा समारंभ छोटेखानी जरी असला तरी त्यामुळे शाखेतील कर्मचाऱ्यांमध्ये एक आपुलकीची जाणीव जागृत होत असे.

एकदा माझ्या वाढदिवसाच्या दिवशी आमच्या शाखेत प्रसिद्ध पार्श्वगायक व मिमिक्री कलाकार सुदेश भोसले हे काही कामानिमित्त आले होते. आमच्या साहेबांनी या संधीचा सदुपयोग करून घ्यावयाचे योजले. त्यांनी सुदेशना माझ्या वाढदिवसाचा समारंभ त्यांच्या हस्ते पार पाडावा अशी विनंती केली. सुदेशने ही जबाबदारी आनंदाने स्वीकारली. सुदेशच्या हस्ते माझा सत्कार झाला व हा छोटेखानी समारंभ आनंदमयी वातावरणात पार पडला. नंतर आमच्या बँकेतील सहकाऱ्यांच्या विनंतीस मान देऊन माझ्या वाढदिवसानिमित्त गाण्याच्या दोन ओळी सुदेशनी गावून सर्वांचा आनंद द्विगुणीत केला. माझ्या सारख्या एका बाईस हा गोड धक्का होता. दुसऱ्याच्या सुखास आपले सुख मानणे यात सुदेशच्या मनाचा मोठेपणा दिसून येतो. जो कलाकार सामान्याच्याही भावना जपतो. तोच मोठा-मोठा कलाकार होतो.

- **हेमलता रेडकर**, गोरेगाव (प.) मुंबई
दूरध्वनी - २८७३५६१३

Regd. under RNI No. MAHBIL/2008/25425 & Declaration No. PHM/SR/63/VIII/2008 Dated 12/5/2008
SSPO Pune under Postal Concession register No. PNCW/M-144/2011-2013 Dated 10.12.2010
Licence to post at Market Yard P.S.O. on 25th of each Month

## मर्मबंधातली ठेव

जसे तुम्ही तसेच आम्ही, फरक फारसा नाही
आवड तुमची तीच आमची, नावड नाहीच नाही ।।१।।

जगणे सर्वांचेच असते, एकमेका सांभाळणे असते
जगराहटीला समजून घेणे, खरं सुख त्यातच असते ।।२।।

चारचौघांच्या भेटी-गाठी, विनोद, चेष्टा, गप्पा, गोष्टी
मस्करीची कुस्करी नको, ठरो आनंदाची ठेव मोठी ।।३।।

नाती-गोती स्नेहसंबंधाचे, कर्म कठीण असते
सहजीवनाचे मर्म उमजले, त्यासीच हे सहजी जमते ।।४।।

शुभेच्छांचे देणे-घेणे, नूतन वर्षासाठी
संधी मिळते या निमित्ते, सु-'संवादा'साठी ।।५।।

- प्रभाकर कानिटकर
भ्रमणध्वनी - ९८८११९९१९९

## धागे आठवणींचे

मी वळुनी बघतो अवचित जेव्हा मागे
आठवणींचे जुळती मनात सुंदर धागे ।।
ऋतू मयूरपंखी आज जरि ते दूर
हृदयास छेडितो एक अनामिक सूर
स्वप्नांचे जग ते अजून लोचनी जागे
आठवणींचे जुळती मनात सुंदर धागे ।।१।।
ती स्वप्नमालिका अजुनी स्मरते मजला
क्षण क्षण सौख्याचा तेव्हा मी वेचियला
त्या षण्मासाची ओढ जीवाला लागे
आठवणींचे जुळती मनात सुंदर धागे ।।२।।
ऋतू चोरपावली येती आज स्मृतींचे
अन् भावगीत हे गाती सप्तसूरांचे
जोवरी अंबरी चंद्र चांदणे जागे
आठवणींचे जुळती मनात सुंदर धागे ।।३।।

- सुधाकर कुलकर्णी
दूरध्वनी - ०८३२-२७१०३५२

**सूचना :** १) या मासिकांत प्रसिद्ध झालेल्या लेखांतील मतांशी संपादकमंडळ सहमत असेलच असे नाही. तसेच जाहिरातीतील मजकुराची सत्यासत्यता सभासदांनी स्वत: पडताळून घ्यावी. त्याबाबत असोसिएशन वा 'संवाद' चे संपादक मंडळ जबाबदार असणार नाही. २) असोसिएशनचे कार्यालय, सोमवार ते शुक्रवार, संध्याकाळी ६ ते ७.३० या वेळातच उघडे असते. याची कृपया नोंद घ्यावी. संपर्क दूरध्वनी क्रमांक : (०२०) २४३३२१४१

**Thane Office Address**: A/5 Swami Siddharth CHS Ltd., S V Road, Naupada, Thane 400 602. Tel. No : 25446837
Timings : On Tuesday & Friday between 4 pm to 6 pm.

Printed Matter

***If Undelivered Please Return to :***

**STATE BANK OF INDIA PENSIONERS' ASSOCIATION, (MUMBAI CIRCLE), PUNE**
**Anubandh, Building No. B-2, 4th Floor,**
**Block No.16, Near Ramkrishna Math,**
**Sinhagad Road, Pune 411030. Ph: 24332141**

To,

**Publisher** – Shri. Ramchandra Narayan Lalingkar, Secretary, State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune has printed this magazine in the Printing Press owned by **Printer** – Shri.Chandrashekhar Digambar Joshi, Director, Shree J Printers Pvt.Ltd., at 1416 Sadashiv Peth, Datta Kuti, Pune – 411030 on behalf of **Owner** – State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune, at "Anubandh", Bldg.No.B2, Block No.16,Near Ramkrishna Math, Sinhagad Road, Pune – 411030. **Editor** – Shri. Krantisen Ramchandra Athawale – address as above.